# पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इयत्ता 5 वी), मे 2021

बैठक क्र. | | | | | | | | | | | |

संच **A**

**0 1 0 1**

पेपर क्र. - I

## माध्यम : मराठी

वेळ : 11:00 ते 12:30

पृष्ठ : 32

**प्रथम भाषा व गणित**

एकूण गुण : 150

**प्रश्नपत्रिका सोडविण्यापूर्वी कृपया खालील सूचना काळजीपूर्वक वाचा :**

(1) या प्रश्नपत्रिकेत **दोन** विभाग आहेत. त्यापैकी विभाग **I** मध्ये प्रथम भाषा विषयासाठी **1** ते **25** व विभाग **II** मध्ये गणित विषयासाठी **26** ते **75** असे एकूण **75** प्रश्न आहेत. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(2) प्रत्येक प्रश्नासाठी **2** गुण आहेत.

(3) प्रश्नपत्रिका सोडविण्यासाठी एकूण **90** मिनिटांचा कालावधी दिला जाईल.

(4) उत्तरे नोंदविण्यासाठी स्वतंत्र उत्तरपत्रिका दिलेली आहे. प्रत्येक प्रश्नक्रमांकासमोर चार पर्यायासाठी क्रमागत वर्तुळे दिलेली आहेत. त्यातील अचूक उत्तराचा पर्याय क्रमांक असलेले वर्तूळ पुढील उदाहरणात दाखविल्याप्रमाणे रंगवा.
उदा. प्रश्न क्र. **6** च्या बरोबर उत्तराचा पर्याय क्र. **2** असेल, तर तो पुढीलप्रमाणे नोंदवावा.
प्रश्न क्र. **6** ① ● ③ ④

(5) खालीलप्रमाणे नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत. असे उत्तर नोंदविल्यास त्या प्रश्नास 'शून्य' गुण दिले जातील. ✓ ② ⊙ ④

(6) प्रत्येक प्रश्नासाठी एकापेक्षा अधिक वर्तुळात नोंदविलेली उत्तरे, खाडाखोड करून नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(7) एकदा नोंदविलेली उत्तरे पुन्हा बदलता येणार नाहीत.

(8) पर्यायाची उत्तरे नोंदविताना फक्त काळ्या किंवा निळ्या रंगाच्या बॉलपेनचाच वापर करावा. पेन्सिलने नोंदविलेली उत्तरे ग्राह्य धरण्यात येणार नाहीत.

(9) प्रश्नपत्रिकेत प्रत्येक पानावर खाली व शेवटच्या पानावर कच्चे काम करण्यासाठी मोकळी जागा आहे, तेथेच कच्चे काम करावे.

(10) परीक्षेस मर्यादित वेळ असल्याने एखाद्या प्रश्नाचे उत्तर तुम्हाला येत नसल्यास पुढील प्रश्न सोडवा. शेवटी वेळ शिल्लक राहिल्यास उरलेल्या प्रश्नांसाठी पुन्हा प्रयत्न करावा.

(11) एखाद्या प्रश्नात त्रुटी/चूक आढळल्यास त्याबाबत पर्यवेक्षक किंवा परीक्षा केंद्रसंचालक यांच्याकडे विचारणा करू नये.

(12) प्रश्नातील त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन शाळेने किंवा पालकांनी गटशिक्षणाधिकारी किंवा शिक्षणाधिकारी यांच्याकडे लेखी स्वरूपात न पाठवता संबंधित शाळेच्या लॉगीन मधून ऑनलाईन पद्धतीनेच पाठवावे.

(13) त्रुटी/चूक/आक्षेपाबाबतचे निवेदन ऑनलाईन पद्धतीने पाठविण्याची मुदत परीक्षा परिषदेच्या संकेतस्थळावर अंतरिम (तात्पुरती) उत्तरसूची प्रसिद्ध झाल्यापासून 10 (दहा) दिवसांपर्यंत राहील.

(14) मुद्रणदोष किंवा अन्य कारणांमुळे प्रश्न चुकीचा असल्याचे आढळल्यास तज्ज्ञ समितीच्या अभिप्रायानुसार योग्य ती कार्यवाही केली जाईल.

(15) मूळ माध्यमासोबत इंग्रजी भाषेतील प्रश्नपत्रिका दिलेली आहे. मूळ माध्यमातील संदिग्ध प्रश्नांबाबत इंग्रजी प्रश्न पहावेत.

## विभाग - I

## मराठी

**प्र. 01 ते 03 साठी सूचना –**

खालील उतारा काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा.

डॉल्फिन हा खोल समुद्रात राहणारा मासा आहे. त्याची लांबी सुमारे दहा फूट असते. त्याचे तोंड पक्ष्याच्या चोचीसारखे असते. त्याचा पोहण्याचा वेग ताशी सरासरी तीस मैल असतो. काही वेळा तर ते ताशी ४० ते ६० मैल वेगाने पोहतात.

डॉल्फिन मासा इतर माशांसारखा अंडी घालत नाही, तर तो सस्तन प्राणी आहे. माशांप्रमाणे त्याला कल्लेही नसतात. श्वास घेण्यासाठी मधून मधून त्याला पाण्याबाहेर यावे लागते.

डॉल्फिन विभिन्न प्रकारचे बत्तीस आवाज काढतो. डॉल्फिन माणसासारखा मोठमोठ्याने हसू शकतो; ओरडूही शकतो. शिकारीचा पाठलाग करताना तो गुरगुरतो आणि शिकार पकडल्याच्या आनंदाच्या भरात तो 'म्याऊ' असा आवाज काढतो. शत्रूला घाबरवण्यासाठी तो उच्च स्वरात ओरडतो.

डॉल्फिन माशाचे श्रवणेंद्रिय फारच तीक्ष्ण असते. आपल्या दूरच्या प्रवासात हे मासे एकमेकांशी एका विशेष प्रकारच्या ध्वनिलहरींनी संपर्क साधतात.

**01.** डॉल्फिनच्या बाबतीत अचूक माहिती दर्शवणारा पर्याय निवडा.

(1) डॉल्फिन मासा अंडी घालतो.

(2) डॉल्फिन मासा अनेक आवाज काढतो.

(3) डॉल्फिनचे श्रवणयंत्र तीक्ष्ण नसते.

(4) डॉल्फिनचे तोंड पक्ष्याच्या चोचीसारखे असते.

**02.** पुढीलपैकी कोणत्या अर्थाचा शब्द उताऱ्यात आला नाही?

(1) मीन (2) पारध

(3) उथळ (4) विहग

**SPACE FOR ROUGH WORK**

**03.** डॉल्फिनला सारखे पाण्याबाहेर का यावे लागते?

(1) शत्रूला घाबरवण्यासाठी
(2) एकमेकांशी संपर्क साधण्यासाठी
(3) श्वास घेण्यासाठी
(4) माणसांना भेटण्यासाठी

**प्र. 04 ते 06 साठी सूचना –**

खालील कविता काळजीपूर्वक वाचा व त्यावर आधारित विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे पर्यायांतून निवडा.

भारतवासी आम्ही सारे, भारतीय भाई
जमीन पावन भारतातली ही अमुची आई।।
अनेक भाषा अनेक भूषा
अनेक सीमा अनेक रेषा
वंद्य तरी हा एक नकाशा
भिन्न देवळे भिन्न देव पण भेदभाव नाही।।
विविध पाकळ्या एक फुलाच्या
विविध तारका एक नभाच्या
अनेक धारा एक नदीच्या
अनेकतेवर एक तिरंगा झळकत हा राही।।
अमंगलाचे तोडून बंधन
न्यायनीतिला करून वंदन
इथे उभारू नवीन नंदन
हीच प्रतिज्ञा घुमवू आम्ही दिशांतून दाही।।
भारतवासी आम्ही सारे, भारतीय भाई।।

**04.** पुढीलपैकी विशेषण–नाम यांची कोणती जोडी कवितेमध्ये नाही?

(1) भेद भाव
(2) विविध तारका
(3) अमुची आई
(4) अनेक भाषा

**कच्च्या कामासाठी फक्त**

05. कवितेतील वर्णनाशी न जुळणारा कोणता पर्याय आहे?

(1) भारतात अनेक भाषा बोलल्या जातात.

(2) अमंगलाचे बंधन न तोडण्याची प्रतिज्ञा सर्वत्र केली.

(3) आम्ही सारे भारतीय एकमेकांचे बांधव आहोत.

(4) भारतभूमी आपल्याला वंदनीय आहे.

06. पुढीलपैकी कोणत्या शब्दाचा समान अर्थाचा शब्द कवितेत आला आहे?

(1) पण (2) ध्वज (3) प्रदेश (4) अन्याय

07. खालील वाक्यातील विशेषण ओळखा.

तरसाचा ठसा तीन इंच लांब असतो.

(1) तीन (2) ठसा (3) तीन इंच (4) लांब

08. पुढील वाक्यातील नाम नसलेला कोणता शब्द पर्यायांत आला आहे?

मुंगी हा समाजप्रिय कीटक वसाहत करून राहतो.

(1) मुंगी (2) कीटक (3) वसाहत (4) समाजप्रिय

09. वाक्यात असलेले विरामचिन्ह दर्शवणारा पर्याय निवडा.

शिवानी दोन - दोन तास न थकता बोलायची.

(1) संयोगचिन्ह (2) अपसारणचिन्ह

(3) उद्गारचिन्ह (4) प्रश्नचिन्ह

10. पुढीलपैकी निश्चितपणे नपुसकलिंगी नामाचा पर्याय निवडा.

(1) आसूड (2) खोंडे

(3) गोंडे (4) वशिंडे

**SPACE FOR ROUGH WORK**

**11.** पुढीलपैकी एकवचन-अनेकवचनाची अयोग्य जोडी असलेला पर्याय कोणता?

(1) कौल - कौले (2) पातळ - पातळे

(3) शिंग - शिंगे (4) डोकं - डोके

**12.** पुढीलपैकी वाक्प्रचार आणि त्याचा अर्थ यांची चुकीची जोडी कोणती?

(1) तत्पर असणे - तयार असणे (2) फैलावणे - जोराने ओरडणे

(3) दुलदुलणे - हलणे (4) दाह होणे - आग होणे

**13.** चौकटीतील अक्षरांपासून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण म्हणीतील कितव्या क्रमांकांची अक्षरे घेतल्यास 'सविता' चा समानार्थी शब्द मिळेल?

| | | |
|---|---|---|
| म | | |
| खे | खे | ते |
| वी | जे | दे |
| वी | दे | र |
| क | | |

(1) ६ वे, २ रे (2) ५ वे, ११ वे

(3) ६ वे, ४ थे (4) ३ रे, ५ वे

**प्र. 14 ते 16 साठी सूचना –**

पुढील वाक्यांचा एक सुसंगत परिच्छेद तयार होण्यासाठी योग्य उत्तरांचे पर्याय निवडा.

**14.** आज सारसबाग मुलांनी ............... होती.

(1) आनंदी (2) खेळत

(3) दुःखी (4) गजबजली

**कच्च्या कामासाठी फक्त**

15. निमित्त होते ................
(1) दिवाळीचे (2) बालमेळाव्याचे
(3) उन्हाळ्याचे (4) सुट्टीचे

16. बालदिनाचे औचित्य साधून मुलांनी आज ............... करण्याचे ठरविले.
(1) रडगाणे (2) धमाल (3) त्रास (4) अभ्यास

17. खाली दिलेल्या वाक्यातील चुकीचा भाग असलेला पर्याय ओळखा.
आई म्हणाली, \ ''अग दीपा, \ तुझं कुणाशी \ बिनसलंय का?''
(अ) (ब) (क) (ड)
(1) (अ) (2) (क)
(3) (ब) (4) (ड)

18. पुढीलपैकी समानार्थी शब्दांची अचूक जोडी असलेला पर्याय ओळखा.
(1) दूम - पत्ता (2) उत्तुंग - उत्सुक
(3) धनी - श्रीमंती (4) समर्थन - खंबीर

19. 'निरूत्साह' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द पर्यायांतून निवडा.
(1) कंटाळा (2) थकवा
(3) हुरूप (4) आनंद

20. 'क, स, र, ला, कु' या अक्षरांपासून तयार होणाऱ्या अर्थपूर्ण शब्दातील कितव्या क्रमांकांची अक्षरे घेतल्यास 'पाणि' या अर्थाचा शब्द तयार होईल?
(1) पहिले व तिसरे (2) तिसरे व चौथे
(3) चौथे व पाचवे (4) पहिले व पाचवे

**SPACE FOR ROUGH WORK**

21. खाली दिलेल्या अर्थाचा योग्य आलंकारिक शब्द पर्यायांतून ओळखा.

'सरळमार्ग सोडून वाकड्या मार्गाने जाणे'.

(1) पांढरा हत्ती (2) द्राविडी प्राणायाम

(3) नस्ती उठाठेव (4) चांडाळ चौकडी

22. पुढीलपैकी प्राणी व त्यांचे घर दर्शवणारी चुकीची जोडी पर्यायांतून निवडा.

(1) घोडा-पागा (2) साप-बीळ

(3) ससा-ढोली (4) कोंबडी-खुराडे

23. 'ठराविक काळाने प्रसिद्ध होणारे' या शब्दसमूहासाठी योग्य शब्द पर्यायांतून निवडा.

(1) मासिक (2) पाक्षिक

(3) वार्षिक (4) नियतकालिक

24. 'अभ्यासिले वेद झाला शास्त्रबोध।
साहिल्या विविध नाना कळा।।'

या काव्यपंक्ती पुढीलपैकी कोणी रचल्या आहेत?

(1) संत नामदेव (2) संत जनाबाई

(3) संत सेनामहाराज (4) संत एकनाथ

25. पुढीलपैकी लेख व लेखक यांची अचूक जोडी ओळखा.

(1) ढोल - द.मा.मिरासदार

(2) जनाई - सदाशिव माळी

(3) कठीण समय येता - मनोहर भोसले

(4) कारागिरी - श्रीराम पचिंद्रे

**कच्च्या कामासाठी फक्त**

## SECTION - II

## MATHEMATICS

**26.** How will you write 500 in Roman numerals?

(1) L (2) C

(3) D (4) M

**27.** What is the place value of '4' in 10.345?

(1) 0.004 (2) 40

(3) 400 (4) 0.04

**28.** If ☐2575 – ☐836 = 28739, then which digit will be in the box?

(1) 2 (2) 3

(3) 5 (4) 6

**29.** If the lengths of the sides of an angle are increased, then how does it affect the measure of the angle?

(1) measure of the angle increases

(2) measure of the angle decreases

(3) measure of the angle remains the same

(4) measure of the angle is doubled

**SPACE FOR ROUGH WORK**

## विभाग - II

### गणित

**26.** 500 या संख्येला रोमन संख्याचिन्हात कसे लिहिले जाते?

(1) L
(2) C
(3) D
(4) M

**27.** 10.345 या संख्येमधील ‘4’ ची स्थानिक किंमत किती?

(1) 0.004
(2) 40
(3) 400
(4) 0.04

**28.** ☐2575 – ☐836 = 28739, तर ☐ च्या जागी कोणता अंक येईल?

(1) 2
(2) 3
(3) 5
(4) 6

**29.** कोनाच्या दोन्ही भुजा वाढविल्यास कोनाच्या मापात काय फरक पडतो?

(1) कोनाचे माप वाढते
(2) कोनाचे माप कमी होते
(3) कोनाचे माप तेवढेच राहते
(4) कोनाचे माप दुप्पट होते

**कच्च्या कामासाठी फक्त**

**30.** $5\frac{3}{7}+6\frac{4}{7} = \square$

(1) $11\frac{7}{14}$ (2) $11\frac{7}{49}$

(3) 12 (4) $\frac{39}{7}$

**31.** Write the number in figures,

'Eight abja eighty thousand eight hundred and eight'.

(1) 8,08,00,808 (2) 8,00,80,808

(3) 80,00,80,808 (4) 8,00,00,80,808

**32.** Length of the radius of a circle is 2.5cm and length of a chord of the circle is 3cm. What is the length of the longest chord of the circle in cm?

(1) 6 (2) 5

(3) 3 (4) 5.5

**33.** How many composite numbers lie between 1 to 100?

(1) 75 (2) 25

(3) 24 (4) 74

**34.** What type of angle will be formed, if two lines are perpendicular to each other?

(1) obtuse (2) right

(3) acute (4) reflex angle

**SPACE FOR ROUGH WORK**

**30.** $5\frac{3}{7}+6\frac{4}{7}$ = किती?

(1) $11\frac{7}{14}$ (2) $11\frac{7}{49}$

(3) 12 (4) $\frac{39}{7}$

**31.** 'आठ अब्ज ऐंशी हजार आठशे आठ' ही संख्या अंकात लिहा.

(1) 8,08,00,808 (2) 8,00,80,808

(3) 80,00,80,808 (4) 8,00,00,80,808

**32.** वर्तुळाची त्रिज्या 2.5 सेमी व जीवा 3 सेमी असल्यास वर्तुळाची सर्वात मोठी जीवा किती सेमी लांबीची असेल?

(1) 6 (2) 5

(3) 3 (4) 5.5

**33.** 1 ते 100 या संख्यांमध्ये किती संयुक्त संख्या आहेत?

(1) 75 (2) 25

(3) 24 (4) 74

**34.** दोन परस्परांना लंब असणाऱ्या रेषा कोणत्या प्रकारचा कोन करतात?

(1) विशालकोन (2) काटकोन

(3) लघुकोन (4) प्रविशालकोन

**कच्च्या कामासाठी फक्त**

**35.** If the numbers 32996, 39296, 229997, 39096 are written in descending order, then what will be the sum of the first and third number in that arrangement?

(1) 269093 (2) 72292

(3) 269293 (4) 262993

**36.** If the circumference of a circle - shaped garden is 88m and Swara takes 5 rounds to the garden daily; Then how much distance does she cover in a week?

(1) 3080 km (2) 380 km

(3) 3.08 km (4) 3.8 km

**37.** By how much is the sum of biggest 5-digit number and biggest 2-digit number is greater than the smallest 3-digit number?

(1) 1,00,098 (2) 99,998

(3) 99,999 (4) 1,00,198

**38.** Pradeep bought a mobile for Rs. twenty two and a half thousand and sold the same for Rs. nineteen thousand eight hundred and seventy. How much was his loss?

(1) Rs. 2880 (2) Rs. 2600

(3) Rs. 2630 (4) Rs. 3000

**39.** $\frac{4}{3} + \frac{4}{3} + \frac{4}{3} + \frac{4}{3} + \frac{4}{3} + \frac{4}{3} = \square$

(1) $\frac{24}{18}$ (2) $\frac{20}{3}$

(3) $\frac{24}{9}$ (4) 8

**SPACE FOR ROUGH WORK**

**35.** 32996, 39296, 229997, 39096 या संख्या उतरत्या क्रमाने लिहिल्या असता पहिल्या व तिसऱ्या संख्येची बेरीज किती?

(1) 269093 (2) 72292

(3) 269293 (4) 262993

**36.** 88 मी परीघ असलेल्या वर्तुळाकृती बागेला स्वरा रोज 5 फेऱ्या मारते तर एका आठवड्यात ती किती किमी चालते ?

(1) 3080 किमी (2) 380 किमी

(3) 3.08 किमी (4) 3.8 किमी

**37.** मोठ्यात मोठी 5 अंकी संख्या व मोठ्यात मोठी दोन अंकी संख्या यांची बेरीज 3 अंकी लहानात लहान संख्येपेक्षा कितीने मोठी आहे?

(1) 1,00,098 (2) 99,998

(3) 99,999 (4) 1,00,198

**38.** प्रदीपने साडेबावीस हजार रुपयांना घेतलेला मोबाइल एकोणवीस हजार आठशे सत्तर रुपयांना विकला, या व्यवहारात त्याला किती रुपये तोटा झाला?

(1) 2880 ₹ (2) 2600 ₹

(3) 2630 ₹ (4) 3000 ₹

**39.** $\frac{4}{3} + \frac{4}{3} + \frac{4}{3} + \frac{4}{3} + \frac{4}{3} + \frac{4}{3}$ = किती?

(1) $\frac{24}{18}$ (2) $\frac{20}{3}$

(3) $\frac{24}{9}$ (4) 8

**कच्च्या कामासाठी फक्त**

**40.** Swarda deposited Rs. 25,000 in a bank at a rate of 8 p.c.p.a for 6 years. How much interest will she receive after 6 years?

(1) Rs. 12,000 (2) Rs. 2,000

(3) Rs. 1,500 (4) Rs. 1,200

**41.** If the fractions, $\frac{7}{9}, \frac{5}{9}, \frac{2}{9}, \frac{8}{9}$ are arranged in ascending order, then what will be the sum of first and third fraction in that arrangement?

(1) 1 (2) $\frac{14}{9}$

(3) $\frac{14}{81}$ (4) $\frac{5}{18}$

**42.** While writing the number, 'Seventy lakhs and Seven' is figures, Ishwari wrote one zero less between the two sevens. Then by how much is the number that Ishwari wrote is more or less than the given number?

(1) more by 77,00,014 (2) less by 77,00,014

(3) more by 63,00,000 (4) less by 63,00,000

**43.** Which is the biggest fraction among the following?

(1) $\frac{8}{10}$ (2) $\frac{8}{100}$

(3) $\frac{8}{1000}$ (4) $\frac{8}{10,000}$

**SPACE FOR ROUGH WORK**

**40.** स्वरदाने द. सा. द. शे. 8 दराने एका बँकेत 25,000 ₹, 6 वर्षासाठी ठेवले तर 6 वर्षानंतर तिला किती व्याज मिळेल?

(1) 12,000 ₹ (2) 2,000 ₹

(3) 1,500 ₹ (4) 1,200 ₹

**41.** $\frac{7}{9}, \frac{5}{9}, \frac{2}{9}, \frac{8}{9}$ या संख्या चढत्या क्रमाने लिहिल्यास पहिल्या व तिसऱ्या संख्याची बेरीज किती?

(1) 1 (2) $\frac{14}{9}$

(3) $\frac{14}{81}$ (4) $\frac{5}{18}$

**42.** 'सत्तर लाख सात' ही संख्या लिहितांना ईश्वरीने दोन्ही सात च्या मध्ये एक शुन्य कमी लिहीले तर तिने लिहिलेली संख्या दिलेल्या संख्येपेक्षा कितीने कमी किंवा जास्त आहे?

(1) 77,00,014 ने जास्त (2) 77,00,014 ने कमी

(3) 63,00,000 ने जास्त (4) 63,00,000 ने कमी

**43.** खालील पैकी सर्वात मोठा अपूर्णांक कोणता?

(1) $\frac{8}{10}$ (2) $\frac{8}{100}$

(3) $\frac{8}{1000}$ (4) $\frac{8}{10,000}$

**कच्च्या कामासाठी फक्त**

**44.**

$$\begin{array}{ccccc} & x & y & y & z \\ + & x & z & z & y \\ \hline & y & y & y & y \end{array}$$

Which digits will be there for $x$, $y$ and $z$ respectively?

(1) 4, 3, 0 (2) 2, 4, 2

(3) 3, 6, 2 (4) 4, 8, 0

**45.** In a transaction, the cost price is Rs. thirty two hundred and eighty and the selling price is Rs. thirty four hundred and seventy. Find out whether the transaction had profit or loss and by how much?

(1) Profit of Rs. 180 (2) Loss of Rs. 190

(3) Profit of Rs. 190 (4) Loss of Rs. 170

**46.** Which of the following diagram represents the fraction $\frac{12}{60}$?

(1) 

(2) 

(3) 

(4) 

**47.** Find the alternative which does not fall in the group.

(1) $7 \times 7 \div 7 \times 5 = 35$ (2) $12 - 3 - 5 + 10 = 14$

(3) $5 \times 3 + 4 \times 2 = 70$ (4) $10 - 2 \times 3 + 5 = 9$

**SPACE FOR ROUGH WORK**

**44.**

$$\begin{array}{cccc} & x & y & y & z \\ + & x & z & z & y \\ \hline & y & y & y & y \end{array}$$

$x$, $y$, $z$ च्या जागी अनुक्रमे कोणते अंक येतील?

(1) 4, 3, 0 (2) 2, 4, 2

(3) 3, 6, 2 (4) 4, 8, 0

**45.** ‘बत्तीसशे ऐंशी रूपये खरेदी किंमत व चौतीसशे सत्तर रुपये विक्री किंमत असेल तर या व्यवहारात नफा किंवा तोटा किती होईल?

(1) 180 ₹ नफा (2) 190 ₹ तोटा

(3) 190 ₹ नफा (4) 170 ₹ तोटा

**46.** खालीलपैकी कोणती आकृती $\frac{12}{60}$ या अपूर्णांकाचा सममुल्य अपूर्णांक दर्शविते?

(1) 

(2) 

(3) 

(4) 

**47.** गटात न बसणारा पर्याय शोधा.

(1) $7 \times 7 \div 7 \times 5 = 35$ (2) $12 - 3 - 5 + 10 = 14$

(3) $5 \times 3 + 4 \times 2 = 70$ (4) $10 - 2 \times 3 + 5 = 9$

**कच्च्या कामासाठी फक्त**

**48.** Roshni started her studies at half past eleven in the morning and finished at quarter to two. For how much time did she study?

(1) 3 hours 70 minutes (2) 2 hours 45 minutes

(3) 2 hours 15 minutes (4) 2 hours 30 minutes

**49.** What is the difference between the biggest 3-digit even number and the biggest 2-digit prime number?

(1) 900 (2) 901

(3) 902 (4) 903

**50.** One of the Zilla Parishad schools have 60% girls out of 120 and a private secondary school of the same village has 55% girls out of 200. Find out the total number of girls in that village going to school?

(1) 172 (2) 38

(3) 182 (4) 110

**51.** What number should be subtracted from six and three quarters thousand to get the biggest two digit number ?

(1) 6751 (2) 6651

(3) 7026 (4) 7126

**SPACE FOR ROUGH WORK**

**48.** रोशनी सकाळी साडे अकराला अभ्यासाला बसली व पावणे दोन वाजता उठली तर तिने किती वेळ अभ्यास केला?

(1) 3 तास 70 मिनिटे (2) 2 तास 45 मिनिटे

(3) 2 तास 15 मिनिटे (4) 2 तास 30 मिनिटे

**49.** सर्वांत मोठी तीन अंकी सम संख्या व सर्वांत मोठी दोन अंकी मूळ संख्या यातील फरक किती?

(1) 900 (2) 901

(3) 902 (4) 903

**50.** जिल्हा परिषदेच्या एका शाळेत 120 विद्यार्थ्यांपैकी 60% मुली आहेत. त्याच गावातील खाजगी माध्यमिक शाळेत 200 विद्यार्थ्यांपैकी 55% मुली आहेत तर त्या गावात एकूण किती मुली शाळेत जातात?

(1) 172 (2) 38

(3) 182 (4) 110

**51.** पावणे सात हजारातून किती वजा केल्यास दोन अंकी मोठ्यात मोठी संख्या येईल?

(1) 6751 (2) 6651

(3) 7026 (4) 7126

**कच्च्या कामासाठी फक्त**

**52.** Julie collected Rs. 10 daily in her money bank from 12th May to 26th June. Also she added Rs. 100 given by her uncle and Rs. 240 given by her father to buy a cake for her birthday. She donated the total amount to Chief Minister Relief Fund. How much money did she donate to the Chief Minister Relief Fund?

(1) Rs. 790 (2) Rs. 350

(3) Rs. 800 (4) Rs. 780

**53.** Jeevan went to a bank with two notes of each Rs. 50, Rs. 100 and Rs. 500. He asked for notes of Rs. 20 in return. How many notes of Rs. 20 will he receive?

(1) 60 (2) 65

(3) 55 (4) 63

**54.** Find such a number which when multiplied by itself the product we get is equal to the product of all the divisors of 27.

(1) 529 (2) 27

(3) 9 (4) 18

**55.** Solve : $27 \div 3 + 6 \times 5 = ?$

(1) 75 (2) 15

(3) 39 (4) $\frac{27}{33}$

**56.** Dhanesh bought one and a quarter meter of cloth for pants and one and three quarters meter of cloth for shirt. How much meter of cloth did he buy?

(1) three (2) three and a quarter

(3) two and a half (4) three and three quarters

**SPACE FOR ROUGH WORK**

**52.** ज्युलीने 12 मे ते 26 जून या कालावधीत मनिबँकमध्ये रोज 10 ₹ प्रमाणे जमा केलेली रक्कम आणि त्यात मामाने वाढदिवसाला दिलेले 100 ₹ व बाबांनी केकसाठी दिलेले 240 ₹ घालून सर्व रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दिली तर तिने एकूण किती रक्कम मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी दिली?

(1) 790 ₹ (2) 350 ₹

(3) 800 ₹ (4) 780 ₹

**53.** जीवनने 50 ₹, 100 ₹ व 500 ₹ च्या प्रत्येकी दोन नोटा बँकेत देऊन त्या रकमेच्या 20 रुपयाच्या नोटा मागितल्या तर त्याला 20 ₹ च्या किती नोटा मिळतील?

(1) 60 (2) 65

(3) 55 (4) 63

**54.** अशी संख्या शोधा की त्या संख्येला त्याच संख्येने गुणल्यास येणारा गुणाकार हा 27 च्या सर्व विभाजकाचा गुणाकार असतो.

(1) 529 (2) 27

(3) 9 (4) 18

**55.** सोडवा : $27 \div 3 + 6 \times 5 = ?$

(1) 75 (2) 15

(3) 39 (4) $\frac{27}{33}$

**56.** धनेशने पँटसाठी सव्वा मीटर व शर्टसाठी पावने दोन मीटर कापड घेतले तर त्याने एकूण किती मीटर कापड घेतले?

(1) तीन (2) सव्वा तीन

(3) अडीच (4) पावणे चार

**कच्च्या कामासाठी फक्त**

**57.** Soham was born on 15th June, 2011, which was Thursday. Which was the day on his 5th birthday?

(1) Tuesday (2) Thursday

(3) Wednesday (4) Friday

**58.** Find the percentage of the shaded portion in the following diagram.



(1) 2 % (2) 25 %

(3) 6 % (4) 75 %

**59.** Side of an equilateral triangle is 10cm. A square of perimeter same as to the perimeter of an equilateral triangle is drawn. What will be the side of the square?

(1) 30 cm (2) 8 cm

(3) 7.5 cm (4) 10 cm

**SPACE FOR ROUGH WORK**

**57.** सोहमचा जन्म 15 जून 2011 ला गुरूवारी झाला तर त्याच्या पाचव्या वाढदिवसाला कोणता वार असेल?

(1) मंगळवार (2) गुरूवार

(3) बुधवार (4) शुक्रवार

**58.** आकृतीतील रेखांकित भागाची शेकडेवारी काढा?



(1) 2 % (2) 25 %

(3) 6 % (4) 75 %

**59.** एका समभुज त्रिकोणाची बाजू 10 सेमी आहे. या त्रिकोणाच्या परिमितीइतक्या परिमितीचा चौरस काढल्यास चौरसाची बाजू किती?

(1) 30 सेमी (2) 8 सेमी

(3) 7.5 सेमी (4) 10 सेमी

**कच्च्या कामासाठी फक्त**

**Q. 60 and 61**

**Answer the following questions with the pictograph given below:**

(scale : 1  = 25 students)

| Types of Game | Number of students |
|---|---|
| Football |  |
| Cricket |  |
| Basket ball |  |
| Kabaddi |  |
| Kho-Kho |  |

**60.** How many times are Kabaddi players to the Basket ball players?

(1) 50 (2) 3

(3) 150 (4) 5

**61.** By how much is number of Cricket players and Basket ball players less than number of football players and Kabaddi players?

(1) 75 (2) 50

(3) 25 (4) 150

**SPACE FOR ROUGH WORK**

**प्र. 60 व प्र. 61**

**सूचना : खालील चित्ररूप माहितीच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

(प्रमाण : 1  = 25 विद्यार्थी)

| **खेळाचा प्रकार** | **विद्यार्थी संख्या** |
|---|---|
| फुटबॉल |  |
| क्रिकेट |  |
| बास्केटबॉल |  |
| कबड्डी |  |
| खो-खो |  |

**60.** कबड्डी खेळणारे विद्यार्थी बास्केटबॉल खेळणाऱ्या विद्यार्थ्यांच्या किती पट आहेत?

(1) 50　　(2) 3

(3) 150　　(4) 5

**61.** क्रिकेट व बास्केटबॉल खेळणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ही फुटबॉल व कबड्डी खेळणाऱ्या विद्यार्थ्यांपेक्षा कितीने कमी आहे?

(1) 75　　(2) 50

(3) 25　　(4) 150

**<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>**

**62.** How many times are the number of edges of cuboid to the number of surfaces of cuboid?

(1) double (2) three times

(3) half (4) four times

**63.** In Nana Patil's farm house, there are 300 sacks of grains. Out of which 35% sacks are of wheat, 20% sacks are of Jowar, 15% sacks are of Tur dal and remaining are the sacks of Soyabeans. Find the number of Soyabean sacks at the farm house.

(1) 60 (2) 120

(3) 105 (4) 90

**64.** Find the length of wire required to fence 3 times the two sides of a square shaped ground having area 144 sq. m.

(1) 48 m (2) 14.4 m

(3) 72 m (4) 24 m

**65.** In the month of May, two and a quarter lakhs tourists visited Mahabaleshwar and three quarter lakhs visited Ajanta - Verul caves. How many more tourists visited Mahabaleshwar than Ajanta - Verul caves?

(1) 75,000 (2) 1,25,000

(3) 3,00,000 (4) 1,50,000

**SPACE FOR ROUGH WORK**

**62.** इष्टिकाचितीच्या कडांची संख्या ही इष्टिकाचितीच्या पृष्ठाच्या संख्येच्या किती पट असते?

(1) दुप्पट
(2) तिप्पट
(3) निमपट
(4) चौपट

**63.** नाना पाटलांच्या वाड्यावर 300 पोती धान्य आहे. त्यापैकी 20% पोती ज्वारीची, 35% पोती गव्हाची, 15% पोती तुरीची व उरलेली पोती सोयाबिनची आहेत तर त्याच्याकडे किती पोती सोयाबिनची आहेत?

(1) 60
(2) 120
(3) 105
(4) 90

**64.** 144 चौ. मी. क्षेत्रफळाच्या एका चौरसाकृती मैदानाला फक्त दोन बाजूंनी तीन पदरी तारेचे कुंपण घालण्यासाठी किती लांबीची तार लागेल?

(1) 48 मी.
(2) 14.4 मी.
(3) 72 मी.
(4) 24 मी.

**65.** मे महिन्यात महाबळेश्वरला सव्वा दोन लाख पर्यटकांनी भेट दिली तर अजिंठा वेरूळ लेण्यांना पाऊण लाख पर्यटकांनी भेट दिली. तर महाबळेश्वरला अजिंठा वेरूळ लेण्यापेक्षा किती जास्त पर्यटकांनी भेट दिली?

(1) 75,000
(2) 1,25,000
(3) 3,00,000
(4) 1,50,000

<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>

**66.** 552 minutes = ................ hours and .............. minutes.

(1) 9, 52 (2) 5, 52

(3) 9, 12 (4) 5, 12

**67.** 2400 papers = ................ Ream papers.

(1) 100 (2) 75

(3) 50 (4) 5

**68.** Ramu purchased 45 litres milk with the rate Rs. 35 per litre. He sold all the milk with profit Rs. 315. Find the selling price of milk per litre.

(1) Rs. 37 (2) Rs. 38

(3) Rs. 42 (4) Rs. 44

**69.** A wire measuring 15 m, 50 cm was divided equally into 10 parts. What is the length of each part?

(1) 155 cm (2) 155 m

(3) 150 cm (4) 150 m

**70.** Akash purchased a cycle for Rs. 3250 and sold it for Rs. 2375 after a year. Did he make profit or loss and how much?

(1) Profit of Rs. 775 (2) Profit of Rs. 875

(3) Loss of Rs. 775 (4) Loss of Rs. 875

**71.** If divisor = 105, Quotient = 4250, Remainder = 75, then dividend = ?

(1) 446250 (2) 446325

(3) 446225 (4) 446625

**SPACE FOR ROUGH WORK**

**66.** 552 मिनिटे = ................. तास ............... मिनिटे.

(1) 9, 52 (2) 5, 52

(3) 9, 12 (4) 5, 12

**67.** 2400 कागद म्हणजे किती रिम कागद?

(1) 100 (2) 75

(3) 50 (4) 5

**68.** रामूने 35 ₹ लिटर दराने 45 लिटर दूध खरेदी केले व सर्व दूध 315 ₹ नफा घेवून विकले तर दूधाचा विक्रीचा दर (प्रतिलिटर) किती?

(1) 37 ₹ (2) 38 ₹

(3) 42 ₹ (4) 44 ₹

**69.** 15 मी 50 सेमी लांबीच्या तारेचे 10 समान भाग केले असता प्रत्येक भागाची लांबी किती?

(1) 155 सेमी (2) 155 मी

(3) 150 सेमी (4) 150 मी

**70.** 3250 ₹ ला घेतलेली सायकल आकाशने एक वर्षानंतर 2375 ₹ ला विकली तर या व्यवहारात त्याला नफा झाला की तोटा व किती?

(1) नफा 775 ₹ (2) नफा 875 ₹

(3) तोटा 775 ₹ (4) तोटा 875 ₹

**71.** भाजक = 105, भागाकार = 4250, बाकी = 75, असेल तर भाज्य किती = ?

(1) 446250 (2) 446325

(3) 446225 (4) 446625

**<u>कच्च्या कामासाठी फक्त</u>**

**72.** What will be the cost of the cloth purchased at the rate Rs. 52 per meter for 25 students each requiring one and a half meter ?

(1) 1950 (2) 1850

(3) 2050 (4) 2150

**73.** Solve :

$\frac{7}{4} + \frac{3}{4} \times \frac{4}{3} = ?$

(1) $\frac{10}{3}$ (2) $\frac{11}{4}$

(3) $\frac{19}{16}$ (4) $\frac{14}{11}$

**74.** Kerela express starts at 4 : 10 in the morning from Nagpur and reaches Tiruvananthapuram at 14 : 15 the next day. How much time does it take to travel from Nagpur to Tiruvananthapuram?

(1) 34 hours 5 minutes (2) 34 hours

(3) 22 hours 5 minutes (4) 26 hours 15 minutes

**75.** In Saraswati Vidyalay, 24 packets of milk having each 500 ml of milk was bought and was heated. It was distributed equally among 60 students. Find out how much ml of milk was given to each student.

(1) 250 ml (2) 150 ml

(3) 200 ml (4) 175 ml

**SPACE FOR ROUGH WORK**

**72.** 25 विद्यार्थ्यांसाठी प्रत्येकी दीड मीटर कापड, 52 ₹ प्रती मीटर दराने खरेदी केल्यास किती रुपये खर्च येईल?

(1) 1950 (2) 1850

(3) 2050 (4) 2150

**73.** सोडवा :

$\frac{7}{4}+\frac{3}{4}\times\frac{4}{3} = ?$

(1) $\frac{10}{3}$ (2) $\frac{11}{4}$

(3) $\frac{19}{16}$ (4) $\frac{14}{11}$

**74.** नागपूरहून पहाटे 4 : 10 वाजता सुटणारी केरळ एक्सप्रेस दुसऱ्या दिवशी 14 : 15 ला तिरूअनंतपुरमला पोहचते तर नागपूर ते तिरुअनंतपुरम प्रवासास किती वेळ लागतो?

(1) 34 तास 5 मिनिटे (2) 34 तास

(3) 22 तास 5 मिनिटे (4) 26 तास 15 मिनिटे

**75.** सरस्वती विद्यालयात 500 मिली च्या 24 पिशव्या दूध आणले, दूध गरम करून 60 विद्यार्थ्यांना सारखे वाटले तर प्रत्येक विद्यार्थ्याला किती मिली दूध मिळाले?

(1) 250 मिली (2) 150 मिली

(3) 200 मिली (4) 175 मिली

**कच्च्या कामासाठी फक्त**

**SPACE FOR ROUGH WORK**